CMYK

नवउद्योजक, निर्यातदारांनी जिल्ह्यात प्रक्रिया उद्योग उभारावे - जिल्हाधिकारी डॉ. पाटील >> पान 2

तंत्रज्ञानाच्या मदतीने आरोग्य क्षेत्रात आमूलाग्र बदल करीत मानवी जीवन सुसह्य करणे शक्य - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस >> पान 3

समृद्धी महामार्गावर भीषण अपघातात एक जण जागीच ठार तर एक गंभीर >> पान 4

सुविचार

सत्य, इमानदारी, आणि नम्रता ही जीवनातील सर्वोच्च मूल्ये आहेत.

# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



अर्जुन कपूर, भूमी पेडणेकरच्या शूटिंग दरम्यान दुर्घटना

आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 158 ■ रविवार, दि. 19 जानेवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

## राज्य सरकारकडून पालकमंत्रीपदाची यादी जाहीर

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्य सरकारने दि : १८ जानेवारी २०२५ रोजी शनिवारी पालकमंत्री पदाची यादी जाहीर करण्यात आली होती. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे बीड आणि पुणे पालकमंत्री पदाची जबाबदारी देण्यात आली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून पालकमंत्री पदाचा मुद्दा चर्चेत होता. दरम्यान याचपार्श्र्वभूमीवर पालकमंत्री पदाची यादी ही पुढीलप्रमाणे नमूद करण्यात आली आहे.



१) गडचिरोली – अजित पवार
२) ठाणे – एकनाथ शिंदे
३) मुंबई शहर – एकनाथ शिंदे
४) पुणे – अजित पवार
५) बीड – अजित पवार
६) नागपूर – चंद्रशेखर बावनकुळे
७) अमरावती चंद्रशेखर बावनकुळे
८) अहमदनगर – राधाकृष्ण विखे पाटील
९) वाशिम – हसन मुश्रीफ
१०) सांगली – चंद्रकांत पाटील
११) नाशिक – गिरीश महाजन
१२) पालघर – गणेश नाईक
१३) जळगाव –गुलाबराव पाटील
१४) यवतमाळ – संजय राठोड
१५) मुंबई उपनगर – आशिष शेलार तर सहपालकमंत्री – मंगलप्रभात लोढा
१६) रत्नागिरी – उदय सामंत
१७) धुळे – जयकुमार रावल
१८) जालना – पंकजा मुंडे
१९) नांदेड – अतुल सावे
२०) चंद्रपूर – अशोक उईके
२१) सातारा – शंभूराज देसाई
२२) रायगड – आदिती तटकरे
२३) लातूर – शिवेंद्रराजे भोसले
२४) नंदूरबार – माणिकराव कोकाटे
२५) सोलापूर – जयकुमार गोरे
२६) हिंगोली – नरहरी झिरवाळ
२७) भंडारा – संजय सावकारे
२८) छत्रपती संभाजीनगर – संजय शिरसाट
२९) धाराशिव – प्रताप सरनाईक
३०) बुलढाणा – मकरंद जाधव
३१) सिंधुदुर्ग – नितेश राणे
३२) अकोला – आकाश फुंडकर
३३) गोंदिया –बाबासाहेब पाटील
३४) कोल्हापूर – प्रकाश आबिटकर तर सह पालकमंत्री – माधुरी मिसाळ
३५) वर्धा – पंकज भोयर
३६) परभणी – मेघना बोर्डिकर

वरील प्रमाणे एकूण ३६ पालकमंत्र्यांची नावे आहेत. यामध्ये अजित पवार यांनी पुणे आणि बीड जिल्ह्याचे पालकमंत्रीपदाची धुरा सांभाळणार असल्याचे घोषित केले आहे. धनंजय मुंडेऐवजी आता अजितदादांना बीडचे पालकमंत्रीपद देण्यात येणार असल्याचे अधिकृत वृत्त आहे.

## केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांचा जिल्हा दौरा

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** केंद्रीय आयुष (स्वतंत्र प्रभार), आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव हे रविवारी, दि. १९ जानेवारी रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार आहेत.



त्यांच्या दौऱ्यानुसार, सकाळी ९.३० ते दुपारी १२.१५ वाजेपर्यंत चिखली व मलकापूर येथील स्थानिक कार्यक्रमांना उपस्थिती, दुपारी १ वाजता मलकापूर येथून दाताळामार्गे शेलगांव बाजार ता. मोताळाकडे प्रस्थान व आमदार संजय गायकवाड यांनी आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमांना उपस्थिती, दुपारी १.२० ते ४ वाजेदरम्यान मोताळा तालुक्यातील शेलगांव बाजार, सावरगांव, निपाणा, आव्हा, उऱ्हा, लिहा बु. पिंपळगाव देवी येथील स्थानिक कार्यक्रमांना उपस्थिती, दुपारी ४ ते ५ वाजेदरम्यान पिंपळगांव देवी येथील प्राथमिक आरोग्य केंद्र येथे शासकीय महाविद्यालय व रुग्णालय श्री छत्रपती संभाजीनगर येथील ईडबल्यूएस अंतर्गत मंजूर इमारतीचे ऑनलाईन पद्धतीने उद्घाटन, सायंकाळी ५.१० ते ६.४५ वाजेपर्यंत मोताळा तालुक्यातील सिंदखेड ल, धामणगाव बडे, सारोळा मारोती आणि वडगांव खं येथे आयोजित स्थानिक कार्यक्रमांना उपस्थिती, त्यानंतर सोईनुसार मेहकरकडे प्रस्थान करतील.

## सेलिब्रिटींपासून सरपंचांपर्यंत सर्वच, असूरक्षित, परिस्थिती हाताबाहेर - नाना पटोले

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्रात सेलिब्रेटी, गावचे सरपंच किंवा सर्वसामान्य जनता सुरक्षित नाही. पोलीस सरकारच्या इशाऱ्यावर काम करतात. पोलिसांनी अद्याप आरोपीला पकडलेले नाही. हे फडणवीस सरकारचे अपयश आहे, अशी टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली. ते शनिवारी त्यांच्या नागपूर निवासस्थानी पत्रकारांशी बोलत होते.



राज्यातील परिस्थिती हाताबाहेर गेली असून गुन्हेगारांना पोलिसांची भीती राहिली नाही. आमचे कुणी काही बिघडवू शकत नाही अशी मानसिकता झाली आहे. राज्यातील कायदा सुव्यवस्थेला फक्त गृहमंत्रीच जबाबदार नाहीत, मंत्रिमंडळातच ६५ टक्के मंत्री दागी असतील तर यापेक्षा वेगळे चित्र काय दिसणार आहे, अभिनेता सैफ अली खानवरील हल्ला जाती धर्माच्या दृष्टीकोणातून पाहू नका, असे पटोले म्हणाले.

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या व परभणीतील सोमनाथ सुर्यवंशी यांचा पोलिसांच्या मारहाणीत झालेला मृत्यू या घटनाही जाती धर्माशी जोडून पाहणे चुकीचे आहे. मराठा–ओबीसी वाद भाजपा युती सरकारनेच निर्माण केला, त्यातून जनतेचे मुळ प्रश्न बाजूलाच पडले. शेतमालाला भाव मिळत नाही, शेतकरी आत्म हत्या वाढत आहेत, शेतकरी कर्जबाजारी झाला आहे, युवकांना बरोजगारीचा सामना करावा लागत आहे, महागाई गगनाला भिडली आहे, हे प्रश्न महत्वाचे आहेत. जाती धर्माच्या वादात न पडता सरकारविरोधात सर्वांनी आवाज उठवला पाहिजे,असेही नाना पटोले म्हणाले.

निवडणुकीनंतर बहिण नावडती

विधानसभा निवडणुकीत लाडक्या बहिणीची मते हवी होती म्हणून सर्व बहिणींना योजनेचा लाभ दिला, याच बहिणींच्या मतांवर सत्तेत आले आणि आता भाजपा युती सरकारला लाडकी बहिण योजनेतील त्रुटी दिसत आहेत का? बहिणींची मते घेताना या त्रुटी व पारदर्शकता आठवली नाही का? सरकार आल्यानंतर पडताळणी करण्याची गरज का पडावी? बोगस लाभार्थी बहिणींकडून पैसे परत घेण्याची धमकी मंत्री देत आहेत, यातून भाजपा युतीचा खरा चेहरा उघडा पडला आहे. परंतु भाजपा युती सरकारने जाहिर केल्याप्रमाणे प्रत्येक लाडक्या बहिणीला सरसकट २१०० रुपये दिले पाहिजेत, असेही नाना पटोले म्हणाले.

## वाल्मिक कराडच्या जामीन अर्जावरील सुनावणी लांबणीवर



### २० तारखेला होणार पुढची सुनावणी

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :**संतोष देशमुख हत्या प्रकरणात खंडणी प्रकरणात वाल्मिक कराडचा सहभाग असल्याचा आरोप विरोधकांकडून सातत्याने केला जात आहे. काही दिवसांपूर्वी वाल्मिक कराडवर मकोकाअंतर्गत कारवाई करण्यात आलेली आहे. मकोकाअंतर्गत कारवाई करण्यात आल्यानंतर वाल्मिक कराडला ७ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. आज वाल्मिक कराडच्या जामीन अर्जावर केज जिल्हा व सत्र न्यायालयात सुनावणी पार पडली. वाल्मिक कराडच्या खंडणी प्रकरणातील जामीन अर्जावर येत्या २० तारखेला केज जिल्हा सत्र न्यायालयामध्ये सुनावणी होणार आहे. वाल्मिक कराडच्या वकिलांनी न्यायालयाकडे २२ तारखेला पुढील सुनावणी व्हावी अशी मागणी केली होती. मात्र, न्यायालयानं सुनावणीसाठी २० तारीख दिली आहे.

वाल्मिक कराडला खंडणीच्या गुन्ह्यामध्ये केज जिल्हा सत्र न्यायालयाने न्यायालयाने कोठडी सुनावल्यानंतर कराडच्या वकिलाने कोर्टामध्ये लगेच जामीन मिळण्यासाठी अर्ज केला होता. या अर्जाला सीआयडीकडून कोर्टामध्ये आव्हान देण्यात आले आहे. संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी मकोका लागलेल्या करडची सीआयडीला चौकशी करायची आहे. म्हणून वाल्मिक कराडला जामीन देऊ नये, अशी विनंती सीआयडीने कोर्टाकडे केली होती. याच जामीन अर्जावर आज केजच्या जिल्हा व सत्र न्यायालयासमोर सुनावणी झाली आहे. या सुनावणीत न्यायालयाने २० तारखेला पुढील सुनावणी घेणार असल्याचे सांगितले आहे.

संतोष देशमुख हत्या प्रकरणात सीआयडीकडून कारवाई सुरु आहे. यामध्ये सुदर्शन घुलेसह ७ आरोपींवर मोक्का अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यापूर्वीच या प्रकरणातील आरोपींवर संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्याअंतर्गत कारवाई करणाऱ्या असल्याचे सांगितलं होतं. त्यानंतर या प्रकरणातील सुदर्शन घुले, सुधीर सांगळे, जयराम चाटे, प्रतीक घुले, महेश केदार आणि कृष्णा आंधळे हे सहा आरोपी गुन्हेगारी पार्श्र्वभूमीचे आहेत. त्यामुळे या आरोपींवर मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. दरम्यान, यातील कृष्णा आंधळे हा आरोपी अद्याप फरार आहे.

## सैफ अली खानवरील हल्ल्याप्रकरणी पोलिसांनी मध्य प्रदेशातून एकाला घेतले ताब्यात

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलीवूड अभिनेता सैफ अली खान याच्यावर गुरुवारी मध्यरात्री त्याच्या घरात हल्ला झाला. घरात शिरलेल्या दरोडेखोराने चाकूने वार केले, यात सैफ गंभीर जखमी झाला. या घटनेला दोन दिवस उलटले असून पोलीस त्या हल्लेखोराचा शोध घेत होते, आता या प्रकरणी महत्त्वाची अपडेट समोर आली आहे.

सैफवर झालेल्या हल्ल्याप्रकरणी मुंबई पोलिसांनी आज (शनिवारी) मध्य प्रदेशातून एका संशयिताला ताब्यात घेतलं. सध्या अधिकारी त्याची चौकशी करत आहेत, असे वृत्त इंडिया टुडे टीव्हीने सूत्रांच्या हवाल्याने दिले आहे. सैफवर हल्ला करणाऱ्याचे सीसीटीव्ही फुटेज पोलिसांनी जारी केले होते, त्यानंतरचे त्याचे वांद्रे व दादरमधील फोटो समोर आले होते. आता या प्रकरणी मध्य प्रदेशातून एकाला ताब्यात घेतल्याचे वृत्त आहे.

हल्लेखोराने सैफच्या घरातून बाहेर पडल्यावर कपडे बदलले होते. दोन ठिकाणी तो सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये कैद झाला होता, त्याआधारे पोलिसांनी तपास सुरू केला होता. अभिनेत्यावर हल्ला होऊन ५० तासांहून अधिक काळ लोटला, तरीही हल्लेखोराचा शोध सुरूच आहे. घुसखोराचे एक ताजे सीसीटीव्ही फुटेज आदल्या दिवशी समोर आले होते, ज्यामध्ये तो सैफ अली खानवर हल्ला केल्यानंतर दादरमधील एका दुकानातून हेडफोन खरेदी करताना दिसला होता. आता एका संशयिताला ताब्यात घेण्यात आले आहे.

## शहरी वाहतुकीसाठी एकात्मिक तिकीट प्रणाली - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** सार्वजनिक वाहतूक प्रणाली एका सिंगल मोबिलिटी प्लॅटफॉर्मवर आणण्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वप्न असून, त्यादृष्टीने मुंबईतील पायाभूत सुविधा विकसित करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या उपक्रमामुळे प्रवाशांना केवळ ३०० ते ५०० मीटर चालून सार्वजनिक वाहतूक सुविधेचा लाभ घेता येईल. एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत जलद आणि सुलभ वाहतूक सेवा देण्याचा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस आणि केंद्रीय रेल्वे मंत्री अश्र्विनी वैष्णव यांच्या उपस्थितीत मुंबईतील एकात्मिक तिकीट सेवा प्रणालीवर चर्चा झाली. या बैठकीत मित्रचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रविणसिंह परदेशी, मुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव डॉ.श्रीकर परदेशी, मध्य, पश्र्चिम रेल्वे आणि महामुंबई मेट्रोचे अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की, मुंबईसाठी लोकल रेल्वे ही जीवनवाहिनी आहे. एकत्रिक सेवा प्रणालीमुळे प्रवाशांसाठी कनेक्टिव्हिटी जलद व सुलभ होणार असून, महसूल वाढीसह सार्वजनिक सेवांचा अधिकाधिक वापर होईल. तंत्रज्ञानाचा वापर वाढवून टॅक्सी आणि इतर सेवांसोबत या प्रणालीचे एकत्रिकरण करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी नमूद केले. या प्रकल्पामुळे प्रवाशांना सहजगत्या एकाच प्लॅटफॉर्मवर सर्व वाहतूक सुविधा मिळतील. यामुळे वाहतुकीचे सुलभीकरण होऊन प्रवाशांचा वेळ वाचणार आहे, तसेच वाहतूक व्यवस्थेतील अडथळे दूर होणार असल्याचेही मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी सांगितले.

केंद्रीय मंत्री अश्र्विनी वैष्णव यांनी सांगितले की, मुंबईत सध्या ३,५०० लोकल सेवा कार्यरत आहेत. येत्या काळात आणखी ३०० लोकल सेवा सुरू करण्यासाठी १७,१०७ कोटी रुपयांची गुंतवणूक रेल्वेकडून करण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील रेल्वे प्रकल्पांमध्ये १.७० लाख कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आली आहे. केंद्र आणि राज्य सरकार मुंबईच्या सर्वांगीण विकासासाठी वचनबद्ध असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

महाराष्ट्र सरकार शहरी वाहतुकीसाठी एकात्मिक तिकीट प्रणाली राबविण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलत आहे. महाराष्ट्र इंस्टीट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (चखढ‌ठ–)च्या नेतृत्वाखालील या उपक्रमाचे उद्दिष्ट विविध सार्वजनिक वाहतूक सेवांसाठी तिकीट प्रक्रिया एकसंध व सुलभ करणे आहे. यासाठी ओपन नेटवर्क फॉर डिजिटल कॉमर्स (जछ‌ऊउ) प्लॅटफॉर्मचा तांत्रिक आधार घेतला जाणार आहे.

## दहावी बारावी बोर्ड परीक्षेच्या हॉल तिकिटावर सुद्धा जात आणली

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात येणाऱ्या फेब्रुवारी–मार्च २०२५ च्या दाहवी– बारावीच्या परीक्षेची प्रवेशपत्राबाबत एक मोठी अपडेट समोर आली आहे. दहावी बारावी बोर्ड परीक्षेच्या हॉल तिकिटावर आता विद्यार्थ्यांच्या जात प्रवर्गाचा उल्लेख करण्यात आल्याचे समोर आले आहे. हॉल तिकीटवर केल्या गेलेल्या जात प्रवर्गाच्या उल्लेखानंतर शिक्षण तज्ज्ञ आणि शिक्षकांकडून बोर्डाच्या या निर्णयावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

शाळेत विद्यार्थ्यांच्या जातीची नोंद नेमकी का झाली आहे हे पालकांना आणि विद्यार्थ्यांना कळावे, यासाठी हॉल तिकीटवर जात प्रवर्गाचा रकाना असल्याचा बोर्डाकडून स्पष्टीकरण देण्यात आले आहे. मात्र एकीकडे शाळेच्या दाखल्यावर जातीची नोंद हटवण्याची मागणी होत असताना बोर्डाकडून जात प्रवर्ग हॉल तिकीट वर

### शिक्षण तज्ज्ञ, शिक्षकांचा बोर्डाच्या निर्णयावर प्रश्नचिन्ह

दिला जात असल्याचं समोर आले आहे. यंदाचे वर्षी दहावी, बारावी बोर्डाच्या हॉल तिकीटमध्ये काही बदल करण्यात आले आहेत आणि त्याम ध्येच विद्यार्थी कोणत्या जातीच्या प्रवर्गात मोडतो हे स्पष्ट हॉल तिकीटवर असलेल्या रकान्यात दिसत आहे. बारावी बोर्ड परीक्षेचे हॉल तिकीट वितरित करायला सुरुवात झाली असून दहावी बोर्ड परीक्षेचे हॉल तिकीट सोमवारपासून वितरित केले जाणार आहेत.

कागदपत्रावर जातीची नोंद चुकली असेल तर पालकांना शिक्षणाधिकारी उपसंचालक कार्यालयातून योग्य ती कागदपत्रे सादर करून तो बदल करून घेता येईल, विद्यार्थ्यांची जातीची नोंद शाळेमध्ये योग्य झाली आहे हे कळण्यासाठी हॉल तिकीट वर जात प्रवर्ग दिला असल्याचा सांगितलं गेलंय. सामाजिक न्याय विभागाला विद्यार्थ्यांना विविध योजनांचा लाभ देता यावा, यासाठी दरवेळी जात निहाय आकडेवारी विद्यार्थ्यांची द्यावी लागते. त्यासाठी हॉल तिकिटावर योग्य ती जात प्रवर्ग कळल्यास त्याचा उपयोग होईल, असं बोर्डाकडून सांगण्यात आलंय.

**बोर्डाने घेतलेला निर्णय न पटणारा –हेरंब कुलकर्णी**

दरम्यान, दहावी बारावी बोर्ड परीक्षेच्या हॉल तिकीटावर जातीचा उल्लेख करण्यात आल्याने बोर्डाच्या या निर्णयावर शिक्षण तज्ञ आणि शिक्षकांनी प्रश्नचिन्हे उपस्थित केले आहे. तर बोर्डाने घेतलेला हा निर्णय चुकीचे असल्याचे मत शिक्षण तज्ज्ञ हेरंब कुलकर्णी यांनी व्यक्त केला आहे. खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांची ओळख आपण परीक्षांमध्ये झाकत असतो. विद्यार्थ्यांची ओळख परीक्षकाला कळू नये यासाठी रोलनंबर वर सुद्धा आपण स्टिकर लावत असतो. अशातच या निर्णयावर बोर्ड दिलेले स्पष्टीकरण हे न पटण्यासारखं आहे. एक वेळ जातीचा उल्लेख हा निकालावर छापलं असतं तर चाललं असतं. किंबहुना दाखल्यावर जात असताना पुन्हा हॉल तिकीट वर जातीचा उल्लेख करणे हे ही न पटणारे असल्याचे मत शिक्षण तज्ज्ञ हेरंब कुलकर्णी यांनी व्यक्त केलं आहे.

**१० वीच्या विद्यार्थ्यांना दोन दिवसांत मिळणार हॉल तिकीट**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात येणाऱ्या फेब्रुवारी–मार्च २०२५ च्या दाहवीच्या परीक्षेची प्रवेशपत्र ऑनलाइन पद्धतीनं जारी करण्याची तारीख जाहीर कारण्यात आली आहे. दहावी बोर्ड परीक्षेचे हॉल तिकीट येत्या सोमवारपासून म्हणजेच २० फेब्रुवारीला उपलब्ध होणार आहेत. सर्व माध्यमिक शाळांना फेब्रुवारी मार्च २०२५च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेची प्रवेशपत्रे ऑनलाईन पध्दतीने मंडळाच्या www.mahahsscboard.in या संकेतस्थळाववरुन लिंक द्वारे डाउनलोड करण्याकरिता उपलब्ध होणार आहे.

CMYK

## पत्नी पीडित पुरुषांना संरक्षण मिळावे!

बंगळुरू मध्ये एका कंपनीत अभियंता असलेल्या ३४ वर्षीय अतुल सुभाष या तरुणाने पत्नीच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केली. आत्महत्या करण्यापूर्वी या तरुणाने आपल्यावरील आपबिती ९० मिनिटांचा व्हिडिओ काढून तसेच ४० पाणी सुसाईड नोट लिहून सांगितली. या तरुणाला त्याच्या पत्नी आणि सासरच्यांनी हुंडाबळीच्या चुकीच्या आरोपाखाली तरुंगा मध्ये पाठवले होते. काहीही चूक नसताना या तरुणाला तुरुंगात जावे लागले. न्यायालयात तो स्वतःचं निर्दोषत्व सिद्ध करू शकला नाही. समाजात त्याची बदनामी झाली त्यामुळे आलेल्या नैराश्यातून त्याने आत्महत्या केली. अर्थात अशी आत्महत्या करणारा अतुल सुभाष हा पहिला तरुण नाही याआधीही अनेक तरुणांनी पत्नीच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केल्या आहेत. ज्या तरुणांमध्ये आत्महत्या करण्याची हिंमत नसते ते तरुण पत्नीचा जाच मुकाटपणे सहन करतात किंवा घर सोडून आश्रमात जातात. औरंगाबादेतील वाळूंज भागात असाच पत्नी पिढीत पुरुषांचा आश्रम आहे. या आश्रमात काही पत्नी पिढीत पुरुष राहतात हे पत्नी पिढीत पुरुष वटपौर्णिमेच्या आदल्या दिवशी पिंपळ पूजन करून पिंपळ पौर्णिमा साजरी करतात. हे पुरुष दरवर्षी पिंपळ पौर्णिमा साजरी करतात. आमच्या बायकांनी आम्हाला इतका त्रास दिला आहे की आम्ही त्यांच्यासोबत सात जन्मच काय सात सेकंदही संसार करू शकत नाही म्हणूनच आम्हाला अशा प्रकारच्या बायका देण्यापेक्षा कायमस्वरूपी मुंजा ठेव अशी प्रार्थना ते यम आणि मुंजाला करतात. हा प्रकार काहीसा विचित्र वाटत असला तरी खरा आहे. कौटुंबिक हिंसाचारात महिलांवरच अन्याय अत्याचार होतो. महिलाच हिंसेचा बळी ठरतात हे आपल्याला माहीत आहे पण पुरुषही कौटुंबिक हिंसाचाराचे बळी ठरतात यावर अजूनही अनेकांचा विश्र्वास बसत नाही याला कारण आहे आपली पुरुष प्रधान संस्कृती. पुरुषच महिलांवर अत्याचार करतो, त्यांचा मानसिक छळ करतो हेच आजवर आपण पाहत आलो आहोत पण आता काळ बदलला आहे. पुरुषही महिलांच्या अत्याचाराला बळी पडत आहे. आज कितीतरी पुरुष महिलांचा मानसिक अत्याचार सहन करत आहेत. पत्नी आपल्यावर अत्याचार करते, आपला मानसिक छळ करते हे जर समाजात माहीत झाले तर आपलीच नाचक्की होईल या भीतीने अनेक पुरुष तो अत्याचार मुकाट्याने सहन करतात. ज्यांना हा अत्याचार सहन होत नाही ते अतुल सुभाष सारखे तरुण आत्महत्येचा मार्ग स्वीकारतात. कायदाही महिलांच्याच बाजूने आहे. महिलेचा पती व त्याच्या कुटुंबियांकडून होणारा छळ रोखण्यासाठी ४९८ ( अ ) हा कायदा करण्यात आला. महिलांना संरक्षण देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या या कायद्याच्या अलीकडे मोठ्या प्रमाणात दुरुपयोग होऊ लागला आहे. या माध्यमातून पती आणि सासरच्या लोकांविरुद्ध वैयक्तिक सुड उगवला जात आहे. महिलांनी त्यांच्या संरक्षणासाठी केलेल्या कायद्याच्या अशाप्रकारे दुरुपयोग करू नये अशी टिप्पणी माननीय सर्वोच्च न्यायालयाने देखील केली आहे. तरीही या कायद्याचा दुरुपयोग कमी होत नाही. पत्नीने पती विरुद्ध तक्रार दिली तर त्याची तातडीने दखल घेतली जाते. पत्नीवर अन्याय करणाऱ्या पतीला तात्काळ अटक केली जाते पण पतीला पत्नी विरुद्ध कारवाई करायची असेल, तर आपल्या देशात कौटुंबिक हिंसाचार अधिनियमना सारखा कायदा उपलब्ध नाही. सध्या असलेला कौटुंबिक अधिनियम संरक्षण कायदा पुरुषांना संरक्षण देत नाही. विकसित देशांमधील लिंग निरपेक्ष कायदे पुरुषांना महिलां प्रमाणे संरक्षण तर देतातच ; शिवाय पुरुष पीडित असू शकतात या वास्तवाचा स्वीकारही करतात. त्यामुळे तिथे या विषयावर संशोधनही होत असते आपल्या देशात पुरुषही महिला अत्याचाराने पीडित असतात हे वास्तव अजूनही स्वीकारले जात नाही. पुरुष कौटुंबिक हिंसाचाराचे बळी ठरुच शकत नाही अशी धारणा असणारे लोक सामान्यतः असा तर्क देतात की पुरुष हे महिलांपेक्षा बलवान असतात अशा स्थितीत महिला पुरुषांवर आघात कशा करू शकतात? पण एका संशोधनात असे सिद्ध झाले आहे की हिंसक संबंधांमध्ये महिलाही पुरूषां इतकीच आक्रमक होऊ शकते. शिवाय मानसिक छळ करण्यात महिलांचा हात कोणीही धरू शकणार नाही. विशेषतः जे संवेदनशील मनाचे पुरूष असतात ते अशा हिंसाचाराला बळी पडतात त्यामुळे महिलां प्रमाणेच पीडित पुरुषांनाही संरक्षणाचा अधिकार मिळावा यासाठी सरकारने कौटुंबिक हिंसाचार अधिनियम कायद्यात दुरुस्ती करून पत्नी पीडित पुरुषांना संरक्षण द्यावे.

# नवउद्योजक, निर्यातदारांनी जिल्ह्यात प्रक्रिया उद्योग उभारावे - जिल्हाधिकारी डॉ. पाटील

**- औद्योगिक हब बनविण्यासाठी मरगळ झटका अन् मैदानात उतरा**
**- केंद्र व राज्य शासनाकडून मिळते ९० टक्क्यांपर्यंत अनुदान**






दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** :जिल्ह्यात कापूस, मका, सोयाबीन इ. शेतमालाचे उत्पादन मोठ्याप्रमाणात होते. परंतू शेतीमालावर प्रक्रिया करुन निर्यात करणारे उद्योग कमी आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील नवउद्योजक, निर्यातदारांनी कच्चा शेतमालावरील प्रक्रिया उद्योग उभारुन निर्यात वाढवावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांनी करत या उद्योगांसाठी केंद्र व राज्य शासनाकडून भरीव अनुदानही दिले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील पुढे म्हणाले की, बुलढाणा जिल्हा हा अमरावती विभागात सर्वाधिक निर्यात करणारा जिल्हा आहे. सन २०२३-२४ मध्ये ८४१ कोटी निर्यात केली आहे. तसेच ऑक्टोबर २०२४ पर्यंत ४६५ कोटी झाली आहे. त्यात प्रामुख्याने कापूस,ऑरगॅनिक केमिकल्स,कॉस्मेटिक उत्पादने, इंजिनियरिंग उत्पादने, डाळी, बी-बियाणे, रोपटे इ.निर्यात केली जाते. बुलढाणा जिल्हा हा कृषिप्रधान आहे. जिल्ह्यात शेतमालाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात आहे, परंतू शेतमालावर प्रक्रिया करुन निर्यात करणारे उद्योग घटक फारसे नाहीत. त्यामुळे जिल्ह्यात कापूस व मक्यावर प्रक्रिया करुन उपउत्पादने तयार करुन निर्यात करणारे उद्योग उभारणे आवश्यक आहे.

देशात ६० टक्के खाद्यतेल हे आयात केले जाते. बुलढाणा जिल्ह्यात सोयबीनचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होते, परंतू प्रक्रिया उद्योग नसल्याने कृषी उत्पादनाला फारसा भाव मिळत नाही. यासाठी शेतकरी उत्पादक संस्था, कंपन्यांनी कृषीमाल संकलित करुन प्रक्रिया उद्योग उभारण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी केले.

जिल्हा उद्योग केंद्रामार्फत राबविण्यात येणाऱ्या औद्योगिक समूह योजनेअंतर्गत अन्न प्रक्रिया, फळ प्रक्रिया यासारखे नवीन समूह उद्योग उभारण्यात यावेत. जिल्ह्याची औद्योगिक, आर्थिक क्षमता ही जमेची बाजू आहे. भविष्यात बुलढाणा जिल्हा हा औद्योगिक हब होऊ शकतो. नवउद्योजक, निर्यातदारांनी मरगळ झटकून जिल्ह्याच्या औद्योगिक विकासासाठी मैदानात उतरले पाहिजे. जिल्ह्याला समृद्धी महामार्ग जोडला आहे. या महामार्गावर जागा घेवून उद्योग उभारण्यास वाव आहे. उद्योग उभारणीसाठी केंद्र व राज्य शासनाच्या योजनांमार्फत ९० टक्क्यापर्यंत भरीव अनुदानही दिले जाते त्या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहनही जिल्हाधिकारी यांनी केले.

परदेशातील आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत एखाद्या उत्पादनाची निर्यात करतांना त्या देशातील सुरक्षा मानकांची (सेफ्टी स्टॅन्डर्ड) माहिती करुन घेण्याची गरज आहे. त्यासाठी निर्यात प्रोत्साहन परिषदामधून, एआय तंत्रज्ञान, इंटरनेटवरुन माहिती घेवून उद्योगात प्रगती करावी. उद्योग विभागामार्फत आयोजित केले जाणारे समिट, कार्यशाळा, खरेदी-विक्री करणाऱ्यांसाठीच्या बैठकांमध्ये निर्यातदार, उद्योजकांनी सहभागी होऊन इतर उद्योगांचा तुलनात्मक अभ्यास करावा. त्यातून आपले उत्पादन निवडावे, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन आपले उत्पादन वाढविण्यावर आणि त्याच्या गुणवत्ता वाढीवर भर देणे आवश्यक असल्याचेही जिल्हाधिकारी डॉ. पाटील म्हणाले.

उद्योग सहसंचालक निलेश निकम म्हणाले की, उद्योग संचालनालयामार्फत ३६ जिल्ह्यात कार्यशाळा घेण्यात येत आहे. केंद्र शासनामार्फत 'एक जिल्हा, एक उत्पादन' हे धोरण राबविले आहे, तर महाराष्ट्र शासनातर्फे 'एक जिल्हा,दोन उत्पादन' हे धोरण राबविले आहे. त्यानुसार बुलढाणा जिल्ह्यासाठी कापूस व बी-बियाणे या उत्पादनाची निवड करण्यात आली असल्याचे ते म्हणाले.

नागपूरच्या विदेश व्यापार अतिरिक्त महासंचालक स्नेहल ढोके म्हणाल्या की, उद्योजकांना निर्यात करण्यासाठी लागणारे आयात निर्यात प्रमाणपत्र (खएउ) ५०० रुपये शुल्कात ऑनलाईन देण्यात येते. विदेश व्यापार महासंचालनालयामार्फत एक्सपोर्ट प्रोमोशन कॅपिटल गुड्स अंतर्गत उद्योजकांने मशिनरी बाहेरुन आयात केल्यास त्यावर लागणारी कस्टम ड्यूटी माफ केली जाते. पुढील सहा वर्षात माफ केलेल्या कस्टम ड्यूटीच्या सहा पट निर्यात करणे आवश्यक आहे. यासाठी दोन वर्षाची मुदतवाढ दिली जाते.डव्हान्स अथोरायझेशन या योजनेअंतर्गत खरेदी केलेल्या कच्चा मालावर जीएसटी माफ केले जाते. अशी माहिती स्नेहल ढोके यांनी दिली.

येथील बुलढाणा अर्बन रेसीडेन्सी क्लब येथे आयोजित निर्यातदार प्रोत्साहन कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांच्या हस्ते शुक्रवारी करण्यात आले.

या कार्यशाळेला अमरावती क्षेत्राचे उद्योग सहसंचालक निलेश निकम, नागपूरच्या विदेश व्यापार अतिरिक्त महासंचालक स्नेहल ढोके,नाबार्डचे सहाय्यक प्रबंधक गाढे, डाक अधिक्षक गणेश अंभोरे, भारतीय निर्यात ऋण गॅरंटी निगमचे व्यवस्थापक बोरकर, सल्लागार अंकित गुप्ता, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक प्रमोद लांडे, व्यवस्थापक सुनिल पाटील उपस्थित होते.

या मान्यवरांनी निर्यातीबाबत ध्येय, धोरणे व सोयीसुविधांविषयी सादरीकरण केले. या कार्यशाळेच्या अंतिम टप्प्यात प्रश्नोत्तरे घेवून शंकांचे निरसन करण्यात आले. त्यानंतर आभार प्रदर्शन करुन कार्यशाळेची सांगता करण्यात आली.

# मराठमोळ्या प्रियंकाच्या नेतृत्त्वाखालील संघ सेमी-फायनल मध्ये; वर्ल्ड कप दोन पावले दूर

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** भारतात सुरु असलेल्या खो-खो विश्वचषकात यजमान भारतीय महिला खो-खो संघाने उपांत्यपूर्व फेरीत बांगलादेशचा धुव्वा उडवला. यासह भारताने उपांत्य फेरीत धडक मारली आहे. परिणामी भारताचं वर्ल्डकप जेतेपद फक्त दोन विजय दूर आहे. भारताने चौथ्या सामन्यात १०० गुणांचा आकडा पार केला आहे. भारताचा उपांत्य फेरीत सामना दक्षिण अफ्रिकेशी होणार आहे.

कसा झाला सामना : भारतीय महिला संघाने उपांत्यपूर्व फेरीत जबरदस्त खेळी केली. भारतीय कर्णधार प्रियांका इंगळे हीने नाणेफेकीचा कौल जिंकून प्रथम अटॅक करण्याचा निर्णय केला. यानंतर पहिल्या डावात भारताने एकही ड्रीम रन दिला नाही. त्यामुळे पहिल्या डावात भारताने ५०-० अशी आघाडी मिळवली होती. ही आघाडी कमी करण्याचे मोठे आव्हान बांगलादेशपुढे होते. पण बांगलादेशने हा फरक कमी करण्याऐवजी ०६ ड्रिम पॉईंट्स दिले. तर अटॅक करताना फक्त ०८ गुण मिळवले. म्हणजेच दुसऱ्या डावात बांगलादेशकडे फक्त ०२ गुण होते. तर भारताकडे ४८ गुणांची आघाडी होती.

भारताचा दणदणीत विजय : यानंतर तिसऱ्या डावात अटॅक करताना भारतानं आक्रमक अटॅक केला. एका पाठोपाठ एक बॅच तंबूत पाठवत होते. त्यामुळं भारताच्या पारड्यात एका पाठोपाठ एक गुण मिळत होते. तिसऱ्या डावात भारताकडे १०६ गुण होते. परिणामी तिसऱ्या डावातच भारताचा विजय पक्का झाला होता. कारण ९८ धावांची आघाडी भारताकडे होती. चौथ्या डावात अटॅक करून ९८ धावांचा फरक कमी करणे कठीण होते. त्यात भारताने चौथ्या डावातही ड्रीम रनही मिळवला. यासह भारताने हा सामना १०९-१६ गुणांनी जिंकला.

उपांत्यपूर्व फेरीचे निकाल :

पहिला उपांत्यपूर्व सामना : युगांडाचा न्यूझीलंडवर ७१-२६ नं विजय

दुसरा उपांत्यपूर्व सामना : दक्षिण आफ्रिकेचा केनियावर ५१-४६ नं विजय

तिसरा उपांत्यपूर्व सामना : नेपाळचा इराणवर १०९-०८ नं विजय

चौथा उपांत्यपूर्व सामना : भारताचा बांगलादेशवर १०९-१६ नं विजय.

# अर्जुन कपूर, भूमी पेडणेकरच्या शूटिंग दरम्यान दुर्घटना

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** भूमी पेडणेकर आणि अर्जुन कपूर यांच्या आगामी 'मेरे हसबंड की बीवी' चित्रपटाच्या सेटवर मोठी दुर्घटना घडली आहे. चित्रपटाच्या सेटवरील छत कोसळल्याने ही दुर्घटना घडली. या दुर्घटनेत जीवितहानी झाल्याची माहिती अद्याप समोर आलेली नाही. मिळालेल्या माहितीनुसार, या चित्रपटाचे शूटिंग सुरू असताना अचानक सेटवरील छत कोसळले. या दुर्घटनेमुळे सेटवर एकच खळबळ उडाली. या दुर्घटनेत काही जण जखमी झाल्याची शक्यता आहे, परंतु अद्याप अधिकृत दुजोरा मिळालेला नाही.

भूमी पेडणेकर आणि अर्जुन कपूर सुरक्षित :

या दुर्घटनेच्या वेळी भूमी पेडणेकर आणि अर्जुन कपूर सेटवर होते की नाही, याबाबत अद्याप कोणतीही माहिती समोर आलेली नाही. मात्र, दोघेही सुरक्षित असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

या घटनेबाबत अधिक तपशील अद्याप समजू शकलेला नाही. पोलीस आणि बचाव पथक घटनास्थळी दाखल झाले असून, पुढील कारवाई सुरू आहे. या दुर्घटनेची माहिती मिळताच चित्रपटाच्या निर्मात्यांनी आणि कलाकारांनी घटनास्थळी धाव घेतली आहे.

# बहूजनांना आध्यात्मिक क्षेत्रात आणण्याचे काम राष्ट्र संत भगवानबाबांनी केले

## ह भ प न्यायाचार्य डॉ नामदेव महाराज शास्त्री यांचे प्रतिपादन





दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** भगवानगड हा सामाजिक, राजकीय, व आध्यात्मिक क्षेत्रावर काम करत असून येथील महंताला सामाजिक व अध्यात्मिक विषायाचे ज्ञान लागते तरच तो महंत नाही तर बाकीचे हंतअसतात बहुजनांना आध्यात्मिक क्षेत्राकडे वळवण्याचे काम ज्ञानेश्र्वर महाराजांनी ज्ञानेश्र्वरी मधून केले तेच कार्य राष्ट्र संत भगवान बाबांनी पुढे आयुष्यभर केले असे प्रतिपादन ह भ प न्यायाचार्य डॉ नामदेव महाराज शास्त्री यांनी आज १८ जाने रोजी ग्राम वझर आघाव व वाघजई येथील अखंड हरिनाम सप्ताहात प्रवचनात बोलतांना केले यावेळी गावकर्यांनी ज्ञानबा तुकारामांच्या व ढोल ताशाच्या गजरासह रांगोळी सडा सारवण करून गावातून मिरवणूक काढुन भव्य स्वागत केले पुढे बोलतांना ह भ प न्यायाचार्य डॉ शास्त्री म्हणाले की, त्याकाळी सर्व जाति धर्माचे बहूज मानस ज्ञानेश्र्वर महाराजांनी एक करुन ज्ञानेश्र्वरी हा ग्रथ दिला व त्याना आध्यात्मिक क्षेत्राकडे वळवले तेच कार्य भगवानबाबांनी पुढे केले ते नारायण गडाचे १५ वर्ष महंत होते पण जवळच्याच लोकांनी धोका दिल्याने त्यांनी तो गड सोडून १९२१ मध्ये भगवान गडावर पाल उभा करून आपले कार्य चालू ठेवले त्यांनी पंढरपूर दिंडी बहुजनांची मुल शिकली पाहिजे म्हणून मोफत शिक्षणासाठी संभाजीनगर व बिड जिल्हात छत्रालय चालू केले त्याचे पहिले विद्यार्थी पद श्री तात्यासाहेब लहाने माजी आमदार तोताराम कायंदे सह अनेक वकील डॉक्टर कलेक्टर झाले पुढे भिमसिंह बाबा गादीवर बसले याकाळात वाय एस खेडकरांसह इतर लोकांनी गडाची विविध ठिकाणची जागा व जमिनी बळकवल्याने गडाचे मोठे आर्थिक नूकसान झाले पण मला स्व लोकनेते गोपीनाथ मुंढे व प्रमुख भक्त लोकांनी शेहान्नोमध्ये गडाचे गादीवर बसवले तेव्हा पासून बाबांना आपेक्षीत असा गड व कार्य मि उसतोड कामगार व शेतकरी शेतमजुरांच्या घामाच्या पैशातून उभा केला यासाठी शासन कोट्यावधी रु द्यायला तयार होते यामुळे राजकारण व भांडणे होतात म्हणून मी गड राजकारणापासून दूर ठेवला यापुढे तेथे कोणतेही राजकारणी कार्यक्रम होणार नाही गडावर २६ कोटी रु खर्च करून ज्ञानेश्र्वर माऊलींचे मंदीर होत आहे यामधून यापूढे बहुजन विद्यार्थींना आयपिस युपीएससी चे शिक्षण दिल्या जाणार आहे बाबांचे हेच स्वप्न पुर्ण होणार असून यापुढे येथे कोणतेही बांधकाम होणार नाही तर फक्त शिक्षण व आध्यात्मिक कार्य होणार त्यामुळे २०२६ मध्ये गडाला पंच्याहत्तर वर्ष पूर्ण होत असल्याने आमुतमहोत्सव साजरा करणार असून गडाचा यापुढचा महंत सुद्धा जाहीर करण्यात आला असून प्रत्येकांनी या कार्यासाठी दान देण्याचे अवाहन शेवटी त्यांनी केले यावेळी असंख्य भाविक भक्तांची उपस्थिती होती

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### मनोज जरांगे हा निव्वळ गावंडळ आणि मूर्ख वल्गना करणारा व्यक्ती आहे- नवनाथ वाघमारे



दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** मनोज जरांगे हा निव्वळ गावंडळ आणि मूर्ख वल्गना करणारा माणूस असल्याची घणाघाती टीका ओबीसी आंदोलक नवनाथ वाघमारे यांनी केली आहे. बीडमध्ये जरांगेंनी ओबीसीची घरं जाळण्याचं काम केलं मग तो क्रुर नव्हता का? खरंतर जरांगे यांनाच एसआयटी आणि सीबीआयचं प्रमुख करा म्हणजे त्याला काय बोलायचं ते कळेल. जातीय द्रेश पसरवून जरांगेंना मराठा समाजाची दिशाभूल करायची आहे. लातूर जिल्ह्यातील धनगर समाजातील तरुणाच्या हत्येवर जरांगे का बोलत नाही असा सवाल करत वाघमारे यांनी सडकून टीका केली आहे. दरम्यान धनंजय मुंडेंवर होत असलेले आरोप हे सरकार पुरस्कृत असल्याची शंका वाघमारे यांनी उपस्थित केली आहे.

### जन्मदात्या बापानेच केला नऊ वर्षीय मुलाचा खून; बारामती तालुक्यातील होळ येथील घटना

दैनिक आपला विदर्भ

**बारामती/प्रतिनिधी :** बारामती तालुक्यातील होळ येथील पियुष विजय भंडलकर या नऊ वर्षीय बालकाचा त्याच्याच वडिलांनी मुलगा अभ्यास करत नाही म्हणून रागाच्या भरात भिंतीवर डोकं आपटून आणि गळा दाबून त्याचा खून केला. १४ जानेवारी रोजी दुपारी अडीच वाजता राहत्या घरी ही घटना घडली आहे. त्यानंतर हा सर्व प्रकार लपवण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र वडगाव निंबाळकर पोलिसांनी या खुनाचं रहस्य उलघडत वडील विजय गणेश भंडलकर, मयत पियुषची आजी शालन गणेश भंडलकर आणि संतोष सोमनाथ भंडलकर या तिघांवर वडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



वडील विजय भंडलकर यांनी मुलगा पियुष याला तू अभ्यास करत नाही, सारखा बाहेर खेळत असतो, तू तुझ्या आईच्या वळणावर जावून माझी इज्जत घालवणारा दिसतोयस, असे म्हणत त्याला हाताने मारहाण केली. राग अनावर झाला अन् त्यांनी त्याचा गळा दाबून त्याला भिंतीवर आपटले यात त्याचा मृत्य झाला. पियुषची आजी हे सर्व पाहत होती पण तिने मुलगा विजयला अडवलं नाही त्यानंतर विजय याच्या सांगण्याप्रमाणे पियुष हा चक्कर येवून पडला आहे, अशी खोटी माहिती तिने दिली.

संतोष भंडलकर याने डॉ. भट्टड यांच्या दवाखान्यात पियुषला नेल्यानंतर तेथे विजय याच्या सांगण्यावरून पियुष हा चक्कर येवून पडल्याची खोटी माहिती दिली. डॉक्टरांनी पियुष याला होळ येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात घेवून जाण्याचा सल्ला दिला. मात्र तेथे न नेता आणि मयताबाबत गावातील पोलीस पाटील अथवा इतर कोणालाही काहीही न सांगत नातेवाईकांना बोलावून पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मयताचे शवविच्छेदन न करता थेट अत्यंविधीची तयारी केली. पोलिसांना खबऱ्याकडून ही माहिती समजताच पोलिसांनी अंत्यविधी थांबवत पियुष याचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी बारामतीला नेला आणि त्यानंतर तपासात त्याच्या वडिलांनीच पियुषची हत्या केल्याचं समोर आलं आहे.

### आर्टीच्या प्रशिक्षणासाठी नाव नोंदणी करण्याचे आवाहन

**मुंबई/प्रतिनिधी :** मातंग आणि तत्सम जातींच्या उन्नतीकरीता विविध कौशल्य विकास प्रशिक्षण, स्पर्धा परीक्षा पुर्व प्रशिक्षण, विविध योजना राबविण्यात येत आहे. उमेदवारांनी आपल्या आवडीनुसार स्पर्धा परीक्षा, कौशल्य प्रशिक्षणासाठी नाव नोंदणी करावी, असे आवाहन आर्टीचे व्यवस्थापकीय संचालक सुनिल वारे यांनी केले आहे.

ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत ३१ जानेवारी २०२५ पर्यंत आहे. युवकांनी एकाच वेळी मोठ्या प्रमाणात अर्ज केल्यामुळे तांत्रिक अडचणी येत असल्याच्या तक्रारी नागरीकांनी केल्या होत्या. त्यावर तांत्रिक विभागाने गुगल फार्म ऐवजी आर्टीच्या संकेतस्थळावर उमेदवारांना नोंदणीसाठी नवीन अर्ज उपलब्ध करुन दिला आहे. उमेदवारांनी याठिकाणी नोंदणी केल्यानंतर कौशल्य प्रशिक्षणानुसार त्यांच्या अर्जाची छाननी करुन त्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. कौशल्य प्रशिक्षण पुर्ण करणाऱ्या उमेदवारांना नोकरीची संधी मिळणार आहे. जे उमेदवार स्वंयरोजगारासाठी इच्छुक आहेत, त्यांच्या व्यवसायाकरीता आर्थिक मदत करण्यात येणार आहे. ऑनलाईन अर्ज नोंदणी सुरु असल्याची माहिती श्री. वारे यांनी दिली.

असे आहेत प्रशिक्षण कोर्सेस

स्पर्धा परीक्षा: एमपीएससी, युपीएससी, बँक (आयबीपीएस), रेल्वे, जेईई- नीट, युजीसी- नेट/ सेट, पोलीस/मिलीटरी. कौशल्य विकास: परदेशात नोकरीसाठी लागणारे विविध कौशल्य प्रशिक्षण व परदेशी उच्च शिक्षणाची संधी, शेतीपुरक विविध व्यवसाय प्रशिक्षण, हार्डवेअर व सॉफ्टवेअर, तसेच कॉम्प्युटर सर्टिफिकेट संदर्भातील विविध कोर्सेसचे कौशल्य प्रशिक्षण देण्यात येणार आहे. योजना: पीएच. डी, पोस्ट पीएच. डी संशोधनासाठी अधिछात्रवृत्ती (फेलोशिप)

नोंदणी कशी करावी

इच्छुक उमेदवारांनी https://arti.org.in या आर्टीच्या संकेतस्थळावर करिअर हा पर्याय निवडावा आणि ऑनलाईन नोंदणी करावी. किंवा पुढील लिंकवर क्लिक करुन https://arti.org.in/arti-job उमेदवार ऑनलाईन अर्ज करावा.

# तंत्रज्ञानाच्या मदतीने आरोग्य क्षेत्रात आमूलाग्र बदल करीत मानवी जीवन सुसह्य करणे शक्य - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## पॅन आयआयटी वर्ल्ड ऑफ टेक्नॉलॉजी जागतिक परिषद

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** कृत्रिम बुद्धिमत्ता आणि माहिती तंत्रज्ञानाचे मदतीने मानवी जीवनात अनेक सकारात्मक बदल होत आहे. राज्य शासनही आरोग्य क्षेत्रासह कृषी, ग्रामविकासात नवनवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करून नागरिकांच्या 'इज ऑफ लिव्हिंग' मध्ये सुधारणा आणत आहे. आरोग्य क्षेत्रात तंत्रज्ञानाच्या मदतीने क्रांतिकारक बदल घडवून निश्चितच मानवी जीवन सुसह्य करणे शक्य होणार आहे, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज व्यक्त केला.





मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, मुंबई ही जगाची फिनटेक आणि डाटा सेंटर राजधानी होत आहे. जगातील प्रत्येक भागातील नागरिकांना तंत्रज्ञानाच्या युगात पुढे जाण्याची संधी मुंबईमध्ये उपलब्ध होणार आहे. भारत तंत्रज्ञान व आर्थिक विकासामध्ये नेत्रदीपक प्रगती करीत आहे. सध्या भारत जगातली सर्वात मोठी पाचवी अर्थव्यवस्था असून लवकरच तिसऱ्या क्रमांकावर झेप घेणार आहे. यामध्ये महाराष्ट्रानेही एक ट्रिलियन अमेरिकन डॉलर अर्थव्यवस्था होण्याचा विडा उचलला आहे.

जिओ कन्व्हेंक्शन सेंटर येथे 'पॅन आयआयटी वर्ल्ड ऑफ टेक्नॉलॉजी'च्यावतीने आयोजित जागतिक परिषद २०२५ मध्ये मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. कार्यक्रमाला व्यासपीठावर दुबई आर्थिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी हादी बद्री, केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे सचिव प्रा. अभय करंदीकर, शास्त्रज्ञ रघुनाथ माशेलकर, पॅन आयआयटीचे अध्यक्ष देवाशिष भट्टाचार्य, पॅन आयआयटीचे शरद सरफ, अशोक झुनझुनवाला आदी उपस्थित होते.

पायाभूत सुविधांची मोठी कामे देशात सुरू असल्याचे सांगत मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, मुंबईमधील सागरी किनारा रस्ता, अटल सेतूने दळणवळण गतिमान केले आहे. मुंबईत आणखी बऱ्याच पायाभूत सुविधांची कामे सुरू आहेत. राज्य शासन इनोव्हेटिव्ह सोसायटीसाठी प्रयत्न करीत आहे. राज्यातील दुर्गम गावांमध्ये आरोग्य सेवा पुरविण्यासाठी तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यात येत आहे. शासन महात्मा फुले जन आरोग्य योजनेच्या माध्यमातून प्रती वर्ष पाच लाख रुपयांचे उपचार मोफत देत आहे.

हवामान बदल व पर्यावरणाच्या समस्यांमुळे कृषी क्षेत्रासमोर मोठी आव्हाने उभी ठाकली आहेत. या आव्हानांवर तंत्रज्ञानाच्या मदतीने मात करणे शक्य आहे. राज्य शासन शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्यासाठी तंत्रज्ञानाच्या साहाय्याने सौरऊर्जेवर आधारित वीज पुरवठा उपलब्ध करून देत आहे. राज्यात २०२६ पर्यंत १६ गिगॅवॅट वीज उपलब्ध होणार आहे. त्यामुळे संपूर्ण राज्यात शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळणे शक्य होणार आहे. महाराष्ट्र राज्य हे देशात कृषीसाठी सौर ऊर्जा कंपनी स्थापन करणारे पहिले राज्य आहे, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यावेळी म्हणाले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेला द्रोण दीदी उपक्रमही तंत्रज्ञानाच्या मदतीने पुढे नेला जात आहे. राज्यात पाण्याच्या संवर्धनासाठी जलयुक्त शिवार अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून राज्यातील २४ हजार गावांमध्ये जलसंपन्नता आली आहे. आयआय टी मुंबई ही आता केवळ एक शैक्षणिक संस्था राहिली नसून ती 'इंडियन इनोवेशन ऑफ टेक्नॉलॉजी' बनली आहे.

राज्य शासन संशोधनासाठी अनेक क्षेत्रात आयआयटी सोबत काम करीत आहे. द्रोण प्रकल्पासाठी काम सुरू आहे. यामध्ये कंट्रोल अँड कमांड सेंटर, द्रोण पोर्ट बनविले जात आहे. तंत्रज्ञानाच्या मदतीने जीवनात अमुलाग्र बदल घडत असून त्यामुळे निश्चितच भविष्य उज्वल होणार आहे. यावेळी आयआयटीचे संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

# उमरखेड बस स्थानक येथे पोलिसांची बॉम्ब कॉलची रंगीत तालीम



दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी :** जिल्हयातील कोणत्याही ठिकाणी होणाऱ्या दहशतवादी हल्ल्याच्या किंवा बॉम्ब स्फोटाच्या प्रसंगी प्रसंगावधान राखुन करावयाच्या कार्यपध्दती संबंधाने यवतमाळ जिल्हा पोलीस दलाच्या वतीने दिनांक १८/०१/२०२५ रोजीचे १२:३० ते १३:०० वा. दरम्यान बस स्थानक उमरखेड येथे बॉम्ब कॉलची रंगीत तालीम घेण्यात आली. सदर तालीमेच्या अनुषंगाने उमरखेड येथील बस स्थानकाच्या वाहन पार्किंगमध्ये कोणीतरी अज्ञात ईसमाने घातपात करण्याच्या उद्देशाने बॉम्ब असलेली बॅग ठेवली आहे अशी माहीती पोलीस नियंत्रण कक्ष यवतमाळ येथे मिळताच यवतमाळ जिल्हयातील पोलीस यंत्रणा तातडीने घटनास्थळी पोहचुन कोणतीही जिवित अथवा वित्त हानी होवु न देता बॉम्ब शोधक व नाशक पथक तसेच श्वान पथकाव्दारे संपुर्ण घटनास्थळाची घातपातविरोधी तपासणी करण्यात आली आणि सदर बॉम्ब असलेल्या बॅगला बस स्थानकासमोरील निर्मनुष्य केलेल्या ठिकाणी नेऊन सदर बॉंम्ब हा डिफ्युज होणारा नसल्याने त्याचा ब्लास्ट करुन निकामी करण्यात आला. त्यानंतर फॉरेन्सीक टिमच्या मार्फतीने घटनास्थळावरील भौतीक पुरावे जप्त करण्यात आले. सदर घटने दरम्यान थांबवुन ठेवलेली रस्त्यावरील गर्दी ही ट्राफिक पोलीसांच्या मदतीने सुरळीत करण्यात आली. त्यानंतर सदरची कार्यवाही ही पोलीस विभागातर्फेच घेण्यात आलेली एक मॉक ड्रिल असल्याचे मेगा फोनव्दारे नागरिकांना सांगीतले.

सदरची रंगीत तालीम (मॉक ड्रील) श्री. कुमार चिंता, पोलीस अधीक्षक, यवतमाळ, श्री. पियुष जगताप, अपर पोलीस अधीक्षक यवतमाळ, श्री. हनुमंत गायकवाड, डउ्‌झज, उमरखेड, यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. शंकर पांचाळ पोलीस निरीक्षक उमरखेड, सपोनि. सारंग बोम्पीलवार, प्रमुख, दहशतवाद विरोधी शाखा, पोउपनि उल्हास परांडे, बॉम्ब शोधक व नाशक पथक, पोउपनि संजय धवणे, प्रमुख टळ्ढ पथक व ठउ्‌झ पथक, सपोनि रोहीत वेंबरे वाहतुक शाखा, उपविभाग उमरखेड, सपोनि ज्ञानेश्र्वर मुंडाले अंगुलीमुद्रा विभाग, पोहवा अमित मेश्राम, शा. फोटोग्राफर, वैदयकीय अधिकारी, अग्निशामक दल यांनी केली.

एखादा बॉम्ब हल्ला अथवा दहशतवादी हल्ला झाल्यास पोलीसांनी काय करावे तसेच नागरीकांनी प्रसंगावधान राखुन काय काळजी घ्यायला पाहीजे याबाबत सदर रंगीत तालीमव्दारे प्रात्यक्षीक करुन दर्शविण्यात आले तसेच नागरीकांनी जागरुक राहुन दहशतवादासंबंधी काहीही माहीती असल्यास नियंत्रण कक्ष यवतमाळ येथे फो.नं. ०७२३२-२४२७०० व डायल ११२ वर संपर्क करुन कळवावे असे आव्हान यवतमाळ जिल्हा पोलीस दलाच्या वतीने करण्यात येत आहे.

### फरार हल्लेखोराला पकडण्यासाठी मुंबई पोलिसांचा नवा प्लॅन, मोबाईल लोकेशन ट्रेस करणार

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूड अभिनेता सैफ अली खान याच्यावर झालेल्या जीवघेण्या हल्ल्याप्रकरणी पोलिसांकडून कसून तपास सुरू आहे. घटना होऊन दोन दिवस उलटून गेले असले तरी आरोपी सापडलेला नाही. फरार हल्लेखोराला पकडण्यासाठी पोलिसांकडून तपास सुरू आहे. आरोपीला पकडण्यासाठी पोलिसांनी आता नवा प्लॅन आखला आहे. फरार आरोपीला पकडण्यासाठी आता पोलिस मोबाईल लोकेशनची मदत घेणार आहेत.

सैफ अली खान हल्ला प्रकरणात हल्लेखोराला आता मोबाईल लोकेशन आणि सीडीआर यांच्या आधारे शोधण्यात येणार आहे. त्या रात्रीचे इमारत परिसरातील टॉवर लोकेशन आणि आरोपी कोणाशी बोलला आहे का, याची माहिती पोलिस काढत आहेत. त्या वेळी किती मोबाइल ॲक्टीव्ह होते. त्या आधारावर त्या सुरू असलेल्या नंबरचा सीडीआरही काढला जात आहे. वांद्रे येथील एका सीसीटिव्हीत आरोपी फोनवर बोलत जाताना पोलिसांना आढळून आला आहे. ज्यावेळी तो फोनवर बोलत आहे, त्या ठिकाणचं लोकेशन आणि ॲक्टीव नंबरद्वारे पोलिस त्याचं लोकेशन शोधण्याच्या प्रयत्नात आहे. सैफ अली खान धोक्याबाहेर आहे. आरोपींना पकडण्यासाठी पोलिसांनी ३५ टीम तयार केल्या आहे. शुक्रवारी आरोपीचे सीसीटीव्ही फुटेज समोर आले, ज्यामध्ये एक संशयित इमारतीतून पायऱ्यांवरून पळून जाताना दिसत होता. या प्रकरणात पोलिसांना पहिले यश मिळाले आहे आणि एका संशयिताला चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आहे.

गुरुवारी मध्यरात्री २ वाजेच्या सुमारास अभिनेता सैफ अली खानवर एका अज्ञात व्यक्तीने हल्ला केला. पोलिसांच्या प्राथमिक तपासात आरोपी चोरीच्या उद्देशाने घरात घुसल्याचे समोर आले आहे. सैफच्या घरातील मोलकरणीने पोलिसांना सांगितले की, हल्लेखोराने १ कोटी रुपयांची मागणी केली होती.

सैफ अली खानवरील हल्ल्याने सर्वांनाच धक्का बसला आहे. पोलिसांना सीसीटीव्ही फुटेज सापडलं आहे, ज्यामध्ये संशयित इमारतीतून पळून जाताना दिसत आहे. या प्रकरणात, मुंबईत पोलिसांनी एका अज्ञात संशयिताला चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे.

# केईएम रुग्णालयाचे शताब्दी वर्ष समाज उपयोगी ठरावे- मुख्यमंत्री फडणवीस

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** केईएम ही मुंबईच्या सामाजिक जीवनातील महत्त्वाची सामाजिक संस्था आहे. एखाद्या आरोग्य क्षेत्रातील संस्थेने सुवर्ण किंवा शताब्दी महोत्सव साजरा करणे ही त्या संस्थेसाठी अभिमानास्पद बाब असते. मुंबईच्या आरोग्य क्षेत्रात केईएमचे नाव अग्रगण्य आहे. या संस्थेने आपल्या शताब्दी वर्षांमध्ये पदार्पण केले असून संस्थेचे हे वर्ष समाज उपयोगी ठरावे, अशी अपेक्षा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज व्यक्त केली.



सेठ गोवर्धनदास सुंदरदास वैद्यकीय महाविद्यालय व राजे एडवर्ड स्मारक रुग्णालय शताब्दी वर्ष शुभारंभ कार्यक्रमाचे आयोजन केईएम रुग्णालयात करण्यात आले. कार्यक्रमात मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. व्यासपीठावर कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री मंगल प्रभात लोढा, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, राज्यसभा खासदार मिलिंद देवरा, आमदार सर्वश्री अजय चौधरी, कालिदास कोळंबकर , राजहंस सिंह, महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी, अतिरिक्त आयुक्त बिपिन शर्मा, अधिष्ठाता संगीता रावत आदी उपस्थित होते.

संस्थेच्या या १०० वर्षांच्या काळात संस्थेसाठी समर्पणवृत्तीने काम करणाऱ्या लोकांना धन्यवाद देत मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, आरोग्य क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने परिवर्तन होत आहे. राज्य शासनही नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा मिळण्यासाठी आरोग्य क्षेत्रामध्ये आमूलाग्र बद्दल करीत आहे. महात्मा फुले जन आरोग्य योजनेच्या माध्यमातून प्रत्येक व्यक्तीला पाच लाखापर्यंतचे मोफत उपचार मिळत आहे. प्रत्येक जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालयाचे धोरण राज्याने स्वीकारले आहे. त्यानुसार मागील एक वर्षात दहा नवीन वैद्यकीय शासकीय महाविद्यालय राज्यात सुरू करण्यात आली आहे.

कोविडच्या काळात शासकीय रुग्णालयांनी खूप चांगले काम केले. त्यामुळे अनेकांचे जीव वाचले. कोविडच्या काळात शासकीय रुग्णालयाचे काम निश्चितच कौतुकास्पद होते. केईएम हे कुटुंब आहे, यामध्ये प्रत्येक व्यक्तीची काळजी घेतली जाते. हे संस्थेला अभिमानास्पद आहे. संस्थेच्या कर्मचाऱ्यांसाठी २१ मजली इमारतीचे भूमिपूजनही करण्यात आले आहे, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यावेळी म्हणाले.

प्रास्ताविक अधिष्ठाता संगीता रावत यांनी केले. कार्यक्रमाला डॉक्टर्स, प्राध्यापक तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# समृद्धी महामार्गावर भीषण अपघातात एक जण जागीच ठार तर एक गंभीर

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** दिनांक १८.१.२०२५ रोजी सकाळी ०७.०० वा. दरम्यान समृद्धी महामार्ग चानैज क्रमांक ३३६.८ मुंबई कॉरिडोर वर एक भीषण अपघात झाला अपघात एवढा जोराचा होता की यामध्ये कारचा अक्षरचा चुराडा झाला . व रस्त्यावर कारचे अलग अलग पार्ट विखुरली गेले. सकाळी कार क्रमांकचझ–२८–उइ–९५३० चा चालक श्रव मेलानी वय वीस वर्ष राहणार नागपूर, हे आपल्या मित्रासोबत नागपूर वरून संभाजीनगर कडे जात असताना कारचालक ला झोपेची डुलकी लागल्याने कार अनियंत्रित होऊन समोर जात असलेला ट्रक क्रमांकचक–१२–णच्–३४३३ चे चालक वैभव रावसाहेब व्यवहारे वय २८ वर्षे रा. कवडीपाट, लोणी काळभोर, ता. हवेली ,जिल्हा पुणे







हे हळुवारपणे इमर्जन्सी लेनवर आपले वाहन चालत असताना पाठीमागून भरधाव वेगाने येणाऱ्या कारच्या चालकाला झोपेमुळे समोरील ट्रकचा अंदाज न आल्याने पाठीमागून उजव्या साईडच्या टायर जवळ कार धडकली व कार पुन्हा मिडीयम मधील बॅरियर ला धडकून यामध्ये ड्रायव्हर च्या बाजूला समोर बसलेले कार मधील सुजोग सोनी वय २० वर्ष रा. नागपूर हा जागेवरच मरण पावला. व सोबत असलेले आयुष जैन वय वीस वर्ष रा नागपूर हा गंभीर जखमी झाला. व चालक किरकोळ जखमी झाला. त्यांना तात्काळ समृद्धी महामार्ग म्बुलन्स चे डॉक्टर वैभव बोराडे ,डॉक्टर यासीन शहा, चालक दिगंबर शिंदे, व शैलेश दळवी यांनी जागेवर प्रथम उपचार करून पुढील उपचार कमी जालना येथे घेऊन गेले तसेच,समृद्धी महामार्गत टीमचे कैलास आघाव, श्रीकृष्ण बच्छीरे, इंगोले ,गोपाले, कराळे ,अभिषेक काणेकर व पवार या सर्वांनी अथक प्रयत्न करून मृतक व जखमी यांना वाहनाच्या बाहेर काढले. तसेच काही काळ अपघात ग्रस्त कार चे पार्ट वाहना महामार्गावर अस्तव्यस्त झाल्याने महामार्ग पोलीस चे पीएसआय शैलेश पवार ,पोलीस हेडकॉन्स्टेबल दिनकर राठोड व निवृत्ती सानप यांनी महाराष्ट्र सुरक्षा बल चे भगवान गायकवाड, राठोड ,जोशी ,यांच्या मदतीने वाहतूक नियंत्रित करून अपघात ग्रस्त कार पोस्टे सिंदखेडराजा येथे रवाना केले व वाहतूक सुरळीत करण्यात आली. महामार्ग पोलीस मलकापूरचे प्रभारी अधिकारी संदीप इंगळे यांनी सर्व वाहनधारकांना आवाहन करीत आहे की महामार्गावर चालताना सर्व नियमाचे पालन करून व पुरेशी झोप घेऊनच वाहने चालवावी व अपघात टाळता येईल.

## विविध वृत्त...

## मेळघाटातील आदिवासी महिलेची धिंड प्रकरणावर खासदार बळवंत वानखडे यांची प्रतिक्रिया



दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** अमरावतीच्या मेळघाटामध्ये जादूटोणाच्या संशयावरून एका ७७ वर्षी आदिवासी महिलेची गावातून धिंड काढत तिला मारहाण केली आणि गावा बाहेर काढल्याचा संतापजनक प्रकार घडला आहे. यावर अमरावतीचे खासदार बळवंत वानखडे यांनी प्रतिक्रिया दिली ते म्हणाले की पुरोगामी महाराष्ट्र आजही जादूटोणांनी ग्रासले आहे, खुद्द गावातील पोलीस पाटील यांनी आदिवासी महिलेची धिंड काढली, महाराष्ट्राला काळीमा फासणारी घटना आहे, या लोकांना कायद्याचा जरब बसला पाहिजे. जादूटोणावर कारवाई केली जात नाही, जादूटोणावर आदिवासींचं समुपदेशन केले पाहिजे पुरोगामी महाराष्ट्रात अशा घटना घडतात ही निंदनीय आहे तर अंधश्रद्धा निर्मूलन कायद्याची अधिक कठोरपणे अंमलबजावणी करण्याची गरज आहे अशी प्रतिक्रिया अमरावती लोकसभेचे खासदार बळवंत वानखडे यांनी दिली आहे.

## ११,५३६ विद्यार्थ्यांनी दिली ‘नवोदय’ ची निवड चाचणी परीक्षा ४० केंद्रांवर पार पडली परीक्षा ; ४० बैठ पथक होते तैनात

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जवाहर नवोदय विद्यालयाच्या इयत्ता ६ वीसाठी आज जिल्ह्यातील ४० केंद्रांवर निवड चाचणी परीक्षा सुरुळीत पार पडली. या परीक्षेसाठी जिल्हाभरातून तब्बल १२,०७३ विद्यार्थ्यांनी अर्ज दाखल केले होते त्यापैकी ११,५३६ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिली.

### पोलीस बंदोबस्त, सीसीटिव्हीची निगराणी

या निवड चाचणी परिक्षेसाठी कडेकोट पोलीस बंदोबस्त आणि सीसीटिव्हीची निगराणी ठेवण्यात आली होती. तसेच परिक्षेचे कामकाज सुरळीतपणे चालण्याकरिता जिल्ह्यातील १३ तालुक्यामध्ये तहसीलदार यांच्या नेतृत्वाखाली भरारी पथकाची नेमणुक करण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यानुसार तहसीलदारांनी परिक्षेदरम्यान परीक्षा केंद्रास भेटी देवून परीक्षा केंद्रांची पाहणी केली. या संपूर्ण परीक्षा प्रक्रियेवर निगराणीसाठी महसूल विभागाची यंत्रण कार्यरत होती.

या परिक्षेचे कामकाज सुरळीत पार पाडण्याच्या दृष्टीने ४० बैठे पथकांचीही नेमणूक करण्यात आली होती. या पथकांमुळे परीक्षा केंद्रावर कॉपी विरहीत परीक्षा पार पडण्यास मदत झाली. जिल्ह्यातील ४० परीक्षा केंद्रावर सुरळीत पार पडली. या परीक्षा केंद्रावर तसेच प्रक्रियेवर सातत्याने लक्ष ठेवून होतो. कोणत्या परीक्षा केंद्रावर अनुचित प्रकार घडू नये यासाठी प्रशासनाने खबरदार घेतली होती. परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनी केंद्रावर सर्व सोयीसुविधा देण्यात आल्या होत्या. त्यांच्या पालकांनीसुद्धा प्रशासनाला सहकार्य केले. एकंदरीत जिल्ह्यातील सर्वच परीक्षा केंद्रावर जवाहर नवोदय विद्यालयाची निवड चाचणी परीक्षा सुरळीत आणि शांततेत पार पडली,अशी माहिती जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिली.

## राखेच्या अर्थकारणामुळे परळीतील थर्मल पॉवर चर्चेत, आतापर्यंत ९४ हून कर्मचाऱ्यांची बदली

**बीड/प्रतिनिधी :** सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणामुळे वातावरण आधीच तापलेले असताना गेल्या काही दिवसांपूर्वीच आणखी एका सरपंचाचा अपघातात मृत्यू झालाय. परळी धर्मापुरी मार्गावरील मिरवट फाट्यावर राखेची वाहतूक करणाऱ्या टिप्परने दुचाकीला धडक दिल्याने सरपंच अभिमन्यू क्षीरसागर यांचा मृत्यू झालाय. ते सौंदाना गावचे सरपंच होते. त्यानंतर परळीतील राखेचे प्रकरणही चर्चेत आले होते. आता राखेतील अर्थकारणामुळे चर्चेत आलेल्या परळीतील थर्मल पॉवर स्टेशनमधील कर्मचाऱ्यांच्या बदलीचे सत्र सुरू झालेय.

आतापर्यंत परळीतील थर्मल पॉवर स्टेशनमधील ८२ जणांची बदली करण्यात आलीय. तसेच १२ जणांनी बदलीसाठी स्वत:हून अर्ज केले आहेत. विशेष म्हणजे आणखी ५० कर्मचाऱ्यांची बदली प्रस्तावित आहे. त्यामुळे बीडमधील कायदा आणि सुव्यवस्था पूर्वपदावर आणण्यासाठी देवेंद्र फडणवीस सरकारने जोरदार तयारी सुरू केल्याची राजकीय वर्तुळात चर्चा आहे.राज्यातील प्रमुख औष्णिक विद्युत केंद्रांपैकी एक असलेल्या परळीच्या औष्णिक विद्युत केंद्रातील १० ते २० नव्हे तर आतापर्यंत तब्बल ९४ कर्मचाऱ्यांची बदली करण्यात आलीय. भुसावळ येथे उभारण्यात येत असलेल्या २५० मेगावॅटच्या प्रकल्पासाठी हे कर्मचारी हलवले गेल्याची माहिती आहे. परळीत सध्या २५० मेगावॉटचे ३ युनिट आहेत, यासाठी तब्बल ९०० कर्मचारी या ठिकाणी काम करतात. मात्र ७५० मेगावॅटचे संच परळीत असतानादेखील अतिरिक्त कर्मचारी असल्याच्या नावाखाली परळीतून ९४ कर्मचाऱ्यांच्या बदल्या या भुसावळ येथे करण्यात आल्यात. तर आणखी ५० जणांची बदली प्रस्तावित आहे.

## प्रयागराज कुंभमेळ्यासाठी सोडण्यात आलेल्या विशेष रेल्वे गाडयांना शेगाव येथे थांबा मिळावा

### केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी केली रेल्वेमंत्र्यांकडे मागणी

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :**प्रयागराज येथील कुंभमेळाव्यासाठी सोडण्यात आलेल्या विशेष रेल्वे गाडयांना शेगाव रेल्वे स्थानकावर ही थांबा मिळावा अशी मागणी केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली आहे



उत्तर प्रदेशातील प्रयाग राज येथे १३ जानेवारीपासून कुंभमेळाला सुरुवात झाली आहे बारा वर्षानंतर येणाऱ्याया कुंभमेळाव्यात देशभरातील भाविकांना सहभागी होता यावे यादृष्टीकोनातून केंद्र सरकारच्यावतीने विशेष रेल्वे गाड्या ही सोडण्यात आल्या आहे. यामध्ये हुजूर साहेब नांदेड पटना कुंभमेळा एक्सप्रेस,काचीगुडा पटना कुंभमेळा एक्सप्रेस आणि पटना सिकंदराबाद कुंभमेळा एक्सप्रेस ह्याचा समावेश आहे ह्या विशेष रेल्वे गाड्या माझ्या बुलढाणा लोकसभा मतदारसंघातून जात आहे.

परंतु या गाड्यांना शेगाव येथे थांबा नाही . संत गजानन महाराजांचे समाधीस्थळ शेगाव येथे आहे संतनगरी शेगाव येथे देशभरातून लाखो भाविक येत असतात भक्तांची मांदियाळी या ठिकाणी दररोज दिसून येते कुंभमेळा विशेष रेल्वे गाड्यांना शेगाव येथे थांबा दिल्यास भक्तांना शेगाव येथील गजानन महाराजांच्या समाधीस्थळचे दर्शन घेण्याची संधी मिळेल आणि बुलढाणा जिल्ह्यातील भक्तांनाही प्रयागराज येथील कुंभमेळा येथे जाण्यासाठी सुविधा उपलब्ध होईल त्या दृष्टिकोनातून शेगाव रेल्वे स्टेशनवर उपरोक्त तिन्हीही कुंभमेळा विशेष रेल्वेला थांबा द्यावा अशी मागणी केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्रिवन वैष्णव यांच्याकडे एका पत्राद्वारे केली आहे

## घरफोडीचे एकुण ४ गुन्हे उघडकीस आणण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश; २३ लाखाचा मुद्देमाल हस्तगत




दैनिक आपला विदर्भ

**नंदुरबार/प्रतिनिधी :** नंदुरबार जिल्हा पोलीस वसाहतीत अज्ञात चोरटयांनी सोनेचांदीचे दागिणे व रोख रक्कम चोरून नेल्याची घटना घडली होती. ही घटना तसेच ईतर ३ गुन्हे उघडकीस आणण्यात जिल्हा पोलीस दलाला यश आले आहे. या घटनेत अंतर राज्य टोळीतील ५ जणांना ताब्यात घेऊन त्यांच्या कडून २३ लाखाहुन अधिक चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेला आरोपी मध्यप्रदेश येथे असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मध्य प्रदेश येथे जावून ५ संशयित आरोपींना ताब्यात घेतले.

त्यांना गुन्हयाबाबत विश्वासात घेऊन विचारपूस केली असता त्यांनी त्यांचा इतर साथीदारांसह सदरचा गुन्हा केली असल्याची माहिती दिली. सदर आरोपीनी नंदुरबार जिल्हयातील नंदुरबार शहर, शहादा, तळोदा येथे चोरी केल्याचे सांगितले.आरोपींकडुन एकुण २३,३४,३१० रुपये किमतीचा सोन्या चांदीचे दागिने व रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे. आरोपीनी महाराष्ट्र, आंध्रप्रदेश राज्यात सुध्दा घरफोडी केल्याची शक्यता असल्याचे वर्तवण्यात येत आहे.सदर ची कामगिरी जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने केली आहे.

# शासकीय योजनांच्या लाभासाठी शेतकऱ्यांना आता फार्मर आयडी मिळणार !

■ ॲग्रिस्टॅक योजना आता सेल्फ, कॅम्प आणि सीएससी मोडवर

■ उद्यापासून बुलढाणा जिल्ह्यात मोहिमेस सुरुवात

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** शेतकऱ्यांपर्यंत शासकीय योजनांचा लाभ पात्र जलदगतीने पोहोचविण्यासाठी जिल्ह्यात ॲग्रिस्टॅक योजनेअंतर्गत शेतकरी माहिती संच निमिर्ती आणि शेतकऱ्यांचे शेतकरी ओळख क्रमांक अर्थात फार्मर आयडी तयार करण्यात येणार आहे. यासाठी शेतकऱ्यांना स्वत: किंवा शिबिरात आणि सीएससी केंद्रावर नोंदणी करता येणार असून या ग्रिस्टॅक योजनेचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

या ॲग्रिस्टॅक योजनेंतर्गत शेतकऱ्यांना विविध सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी कृषि व संलग्न विभागांमार्फत शेतकऱ्यांचा व त्यांच्या शेताचे आधार संलग्न माहिती संच (फार्मर रजिस्ट्री) तयार करण्यात येणार असून उपलब्ध आकडेवारीच्या आधारे शेतकरी बांधवांना विविध योजनांचा लाभ वितरीत करण्यामध्ये सुलभता येईल आणि लाभार्थ्यांना वारंवार प्रमाणिकरण अर्थात ई–केवायसीची आवश्यकता राहणार नाही.

शेतकरी माहिती संचनिर्मितीसाठी शेतकऱ्यांची नोंदणी तीनही मोड म्हणजेच सेल्फ, कॅम्प आणि सीएससी मोडव्दारे उद्या दि.२० जानेवारीपासून बुलढाणा जिल्ह्यात करण्यात येणार आहे.

सर्व शेतकरी बांधवांनी गावनिहाय आयोजित करण्यात येणाऱ्या शिबीरात जास्तीत जास्त संख्येने सातबारा उतारा, ८अ व आधारकार्डसह उपस्थित राहून आपले ग्राम महसूल अधिकारी, तहसिल कार्यालय व कॉमन सर्व्हिस सेंटरशी संपर्क साधून ॲग्रिस्टॅक योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांनी केले आहे.

ॲग्रिस्टॅक योजनेंतर्गत फार्मर आयडीसाठी https://mhfr.agristack.gov.in/farmer-registry-mh// या लिंकवर नोंदणी करावी किंवा क्यूआर कोडचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## धर्म अन् जातीवर मतदान करणे देशाच्या दृष्टीने चुकीचं; ज्येष्ठ काँग्रेस नेते सुशील कुमार शिंदेंचे प्रतिपादन

**पुणे/प्रतिनिधी :** काँग्रेसच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी कार्यकर्त्यांना संबोधित करताना आता धर्माच्या नावावर मतदान केलं जात असल्यानं वाईट वाटत असल्याचं म्हटलं. त्याला आता प्रणिती शिंदेंचे वडील आणि काँग्रेस ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदेंनी दुजोरा दिलाय. आजपर्यंत लोकांनी कामावर मतदान केलंय, पण आता धर्माच्या नावावर मतदान केलं जातंय, याचं मला वाईट वाटत असल्याचं प्रणिती शिंदेंनी म्हटलंय. यासंदर्भात खासदार प्रणिती शिंदे यांचे वडील ज्येष्ठ काँग्रेस नेते सुशील कुमार शिंदे यांना विचारलं असता ते म्हणाले की, समाज हा आता कुठेतरी धर्मावर, जातीवर मतदान करण्याचा विचार करीत आहे आणि त्याच्यावर मतदान होताना पाहायला मिळतंय. हे या देशाच्या दृष्टीने आणि सामाजिक दृष्टीने चुकीचं असल्याचं मत यावेळी सुशील कुमार शिंदे यांनी व्यक्त केलंय. महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या वतीने दिल्लीत होणाऱ्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या निमित्ताने काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय गृहमंत्री सुशील कुमार शिंदे यांच्या हस्ते पुस्तक प्रकाशन करण्यात आलंय. यावेळी त्यांना याबाबत विचारलं असता त्यांनी आपलं मत व्यक्त केलंय. यावेळी सुशील कुमार शिंदे म्हणाले की, सरहद संस्था आणि संजय नहार यांचं मी मनापासून अभिनंदन करतो. दिल्लीमध्ये साहित्य संमेलन ठेवण्याचं एक धाडस त्यांनी केलंय.

# जनरेटरच्या आडून मद्यतस्करी करणाऱ्यांवर कारवाई; वाहनासह १६ लाखांचा मुद्देमाल जप्त

दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिंधी :** धुळे शहर हद्दीतून होणारी लाखोंची मद्यतस्करी एलसीबीने आज पहाटे उधळून लावली आहे. कहर म्हनजे नवीन जनरेटरच्या रिकाम्या आवरणामध्ये विदेशी दारूचे बॉक्स लपवून ही वाहतूक केली जात होती. या कारवाईत आयशर वाहनासह एकूण १६ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. धुळेमार्गे गुजरात राज्यात आयशर वाहनाद्वारे विदेशी मद्याची वाहतूक होत असल्याची गुप्त माहिती एलसीबीचे




पोलिस निरीक्षक श्रीराम पवार यांना मिळाली होती. त्यानुसार पोलीस निरीक्षक श्रीराम पवार यांनी आपल्या पथकाला कारवाई करण्याबाबत आदेशित केले. एलसीबीच्या पथकाने सुरत बायपासवर खान्देश कॅन्सर सेंटर समोरील सुरत बायपास महामार्गावर नाकाबंदी केली असता त्यांना संशयित आयशर आढळून आला.

यावेळी वाहन चालकाला आयशर मध्ये काय आहे याची विचारणा केली असता त्याने आयशर मध्ये जनरेटर आहे तो गुजरात येथे घेऊन जात असल्याची बतावणी केली, मात्र पोलिसांनी मिळालेल्या माहितीच्या आधारे या जनरेटरची कसून तपासणी केली असता जनरेटरच्या आत मध्ये दारू ठेवल्याचे आढळून आले. महाराष्ट्रामध्ये प्रतिबंधित असलेल्या आणि चोरट्या पद्धतीने वाहतूक करण्यात येत असलेल्या अवैध मद्यसाठा धुळे पोलिसांनी जप्त केला असून चालका विरोधात फसवणूक केल्याचा गुन्हा धुळे शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्रीराम पवार यांनी दिली आहे.